**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः गौखनि-१०/०१२५/प्र.क्र.०५/ख-१,**
**हुतात्मा राजगुरु चौक,**
**मादाम कामा मार्ग, मंत्रालय मुंबई-३२,**
**दिनांक : १ जून, २०२६**

**वाचा :-**

१) महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांकः गौखनि-१०/०१२५/प्र.क्र.०५/ख-१, दि.०८.०४.२०२५

**प्रस्तावना :-**

नैसर्गिक वाळूचे पर्यावरणीय महत्त्व खूप असून नैसर्गिक वाळू जलपरिसंस्थेसाठी महत्वाची आहे. त्यामुळे नदीपात्रातील वाळूवर पडणारा ताण कमी करण्यासाठी कोळसा किंवा लोह खनिजासारख्या इतर मुख्य खनिजांच्या खाणकामधून उप-उत्पादने म्हणून निघणाऱ्या ओव्हरबर्डनमधून तसेच केंद्र / राज्य शासनाच्या अंगीकृत खाणीमधून निघणाऱ्या ओव्हरबर्डनमधून तयार करता येणाऱ्या पर्यावरणपूरक वाळूच्या वापरास प्रोत्साहन देण्याच्या अनुषंगाने वाळू/रेती निर्गती धोरण-२०२५ मध्ये तरतूद केली आहे. ओव्हरबर्डनमधून तयार करता येणाऱ्या पर्यावरणपूरक वाळूच्या निर्मितीसाठी अधिकाधिक उद्योजक पुढे येण्यासाठी सद्यस्थितीत असलेल्या Base Rate मध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

प्रस्तावनेतील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, संदर्भाधिन क्र.२ येथील शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांकः गौखनि-१०/०१२५/प्र.क्र.०५/ख-१, दि.०८.०४.२०२५ मधील भाग-नऊ “केंद्र/ राज्य शासनाच्या मोठ्या खाणीमधील ओव्हरबर्डमधील वाळू व इतर गौण खनिजांची निर्गती” मधील (ii), (iii), (iv) व (v) मध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे. तसेच, नव्याने प्रस्तावित करण्यात येणाऱ्या Sandy Overburden करिता (va) व (vb) येथे नव्याने तरतूद समाविष्ठ करण्यात येत आहे:-

**भाग - नऊ**

**केंद्र/ राज्य शासनाच्या मोठ्या खाणीमधील ओव्हरबर्डमधील वाळू व इतर गौण खनिजांची निर्गती**

**ii.** मोठ्या खाणींमधील ओव्हरबर्डनमधून निघणाऱ्या वाळू/रेती (Wash Sand) साठी WCL व MOIL या कंपन्यांनी जास्तीत जास्त रुपये २,०००/- प्रती ब्रास Base Rate म्हणून शुल्क आकारण्याचे मान्य केले असून त्याप्रमाणे प्रती ब्रास शुल्क आकारण्याची कार्यवाही करावी.

iii. ओव्हरबर्डनमधील वाळूसाठी (Wash Sand) स्वामित्वधनाची रक्कम रुपये ४००/- प्रती ब्रास एवढे आकारण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

iv. ओव्हरबर्डनमधून Wash Sand व्यतिरिक्त निघणा-या इतर गौण खनिजांसाठी WCL व MOIL या कंपन्यांनी रक्कम रुपये २००/- प्रती ब्रास शुल्क आकारण्याचे मान्य केले असुन त्याप्रमाणे प्रती ब्रास शुल्क आकारण्याची कार्यवाही करावी.

v. ओव्हरबर्डनमधील इतर गौण खनिजांसाठी स्वामित्वधनाची रक्कम रु.५०/- प्रती ब्रास एवढे आकारण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

va. ओव्हरबर्डनमधील Sandy Overburden साठी WCL व MOIL या कंपन्यांनी रक्कम रुपये ६००/- प्रती ब्रास शुल्क आकारण्याचे मान्य केले असुन त्यानुसार शुल्क आकारण्याची कार्यवाही करावी .

vb. ओव्हरबर्डनमधील Sandy Overburden साठी स्वामित्वधनाची रक्कम रु.२००/- प्रती ब्रास एवढे आकारण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०६०१११५१५८६८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RATHOD UMESH DHARMA

Digitally signed by RATHOD UMESH DHARMA
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Department,
2.5.4.20=FA30EEF6A9E239E9B4F8129A1B10556B20319BBEC898D94F4E0E028A365FCEC5, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=3667A98F6D3E5F0ED5652697D674C2EB05D852DD34F87FDA6A20696C80787981, cn=RATHOD UMESH DHARMA
Date: 2026.06.01 11:53:25 +05'30'

**( डॉ. उमेश ध. राठोड )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अ.मु.स., मंत्रालय, मुंबई
३) मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व युवक कल्याण आणि अल्पसंख्याक विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानभवन, मुंबई
७) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
८) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानभवन, मुंबई
९) मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
१०) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
११) सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१२) सर्व मा.विधानसभा/विधानपरिषद सदस्य, विधानभवन, मुंबई.
१३) महालेखापाल-१, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), (लेखापरिक्षा), मुंबई.
१४) महालेखापाल-२, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), (लेखापरिक्षा), नागपूर.
१५) सर्व मंत्रालयीन विभाग.
१६) सर्व विभागीय आयुक्त.
१७) संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर.
१८) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१९) प्रधान मुख्य वन संरक्षक, नागपूर.
२०) सर्व जिल्हाधिकारी.
२१) निवडनस्ती "ख कार्यासन.